दैनिक
# महाराष्ट्र जीत
मुख्य संपादक : सागरा राणा अंभोरे संपादक : बंडूभाऊ इंगोले
RNI No - MHMUL/25/A0788
■ वाशीम ■ रविवार, ०८फेब्रुवारी २०२६ ■ वर्ष : २ ■ अंक : ३०२ ■ पाने : ४ ■ किंमत : ५ रूपये ■ Title code:- MAHMUL039353

## आगामी काळात महाराष्ट्राचा भर धोरण आधारित विकासावर – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

महाराष्ट्र जीत

**नागपूर :** येत्या काळात महाराष्ट्राचा भर धोरण आधारित विकासावर राहणार आहे. यासाठी आम्ही अनेक धोरणे आखली असली, तरी काही धोरणे जुनी झाली असल्याने भविष्यातील गरजा, बदल आणि आव्हाने लक्षात घेऊन येत्या दोन-तीन महिन्यात विविध क्षेत्रांतील भविष्योन्मुख (फ्युचर रेडी पॉलिसी) धोरणे आणली जाणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे दिली.






असोसिएशन फॉर इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंटद्वारे आयोजित ॲडव्हांटेज विदर्भ-खासदार औद्योगिक महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी इंटरनॅशनल बिझनेस कॉनक्लेव्हचे उद्घाटन झाले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. व्यासपीठावर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, ग्लोबल इंडिया बिझनेस फोरमचे जागतिक अध्यक्ष जितेंद्र जोशी, असोसिएशन फॉर इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंटचे अध्यक्ष आशिष काळे यांच्यासह तब्बल २२ देशांचे राजदूत, उच्चायुक्त व बिझनेस प्रतिनिधींची प्रमुख उपस्थिती होती. विशेष म्हणजे याच परिषदेत गुंतवणुकीचे तीन सामंजस्य करारही पार पाडण्यात आले.

याप्रसंगी बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, महाराष्ट्र हे सध्या वेगाने विकसित होणारे राज्य आहे. त्यातल्या त्यात विदर्भाचा प्रदेश झपाट्याने विकसित होत आहे. महाराष्ट्रात सामंजस्य करार केवळ कागदावर होत नसून ते प्रत्यक्षात साकारले जात आहेत. लॉजिस्टिक्स, एआय, सोलर क्षेत्रामध्ये महाराष्ट्र देशात अग्रेसर आहे. सर्वाधिक विदेशी गुंतवणूक महाराष्ट्रात येत आहे.राज्य सरकारने गेल्या काही महिन्यांमध्ये जीसीसी पॉलिसी, जेम्स अँड ज्वेलरी पॉलिसी, बांबू पॉलिसी जाहीर केली आहे. नवे औद्योगिक धोरण आले आहे. त्यानंतर आता सात नवीन धोरणांची घोषणा येत्या दोन-तीन महिन्यांत होणार आहे. यामध्ये टेक्सटाइल्स अँड ॲपरल, लेदर अँड फूटवेअर, इलेक्ट्रॉनिक्स अँड फॅब, एरोस्पेस अँड डीफेन्स, एमएसएमई, फार्मास्युटिकल बायोटेक अँड मेडिकल डीव्हायसेस, सर्क्युलर इकॉनॉमी, बायो प्लास्टिक या क्षेत्रांतील धोरणांचा समावेश असेल.

## () थोडक्यात ()

### खेळाडूंना ५ टक्के आरक्षणाचा लाभ जलदगतीने मिळण्यासाठी ‘ब्लॉकचेन तंत्रज्ञान’ वापरण्यास मान्यता

महाराष्ट्र जीत

**मुंबई :** गुणवत्ताधारक शासकीय व निमशासकीय सेवेमधील ५ टक्के आरक्षणाचा लाभ खेळाडूंना पारदर्शक, जलद व त्रुटीमुक्त पद्धतीने मिळावा, यासाठी ब्लॉकचेन व कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence) या अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करण्यास शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने मान्यता दिली असल्याची माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी रश्मी आंबेडकर यांनी दिली.रश्मी आंबेडकर म्हणाल्या की, राज्य व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांचे आयोजन करणाऱ्या सर्व अधिकृत एकविध क्रीडा संघटनांनी स्पर्धा संपल्यानंतर ७ दिवसांच्या आत स्पर्धेचा अंतिम निकाल, सहभागी खेळाडूंची यादी तसेच गुणपत्रिका अभिलेख जतनासाठी संचालनालयाकडे अपलोड करणे बंधनकारक आहे. ही सर्व माहिती संबंधित क्रीडा संघटनेच्या अधिकृत पदाधिकाऱ्यांनी डिजिटल स्वाक्षरीद्वारे प्रमाणित करणे आवश्यक आहे.निर्धारित कालावधीत माहिती अपलोड न केल्यास संबंधित क्रीडा संघटनांचा डिफॉल्टर यादीत समावेश करण्यात येणार आहे.

### ‘भारत रंग महोत्सव २०२६’ मुंबईत ९ ते १३ फेब्रुवारी या कालावधीत

महाराष्ट्र जीत

**मुंबई :** राष्ट्रीय नाट्य विद्यालय, भारत सरकार आणि सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने ‘भारत रंग महोत्सव २०२६’ या भव्य नाट्य महोत्सवाचे आयोजन दि. ९ ते १३ फेब्रुवारी, २०२६ या कालावधीत मुंबईतील रवींद्र नाट्य मंदिर, प्रभादेवी येथे करण्यात आले आहे.या महोत्सवाचे उद्घाटन सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या हस्ते ९ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ६:०० वाजता होणार आहे. या नाट्य महोत्सवात देश-विदेशातील नामांकित नाट्यसंस्थांची पाच नाटके सादर करण्यात येणार आहेत. या सादरीकरणांद्वारे विविध भारतीय भाषांमधील नाट्य परंपरा, सर्जनशीलता आणि प्रयोगशीलतेचा संगम प्रेक्षकांना अनुभवता येईल. या सर्व नाटकांचे प्रयोग प्रेक्षकांसाठी विनामूल्य खुले असून प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य याप्रमाणे बैठक व्यवस्था करण्यात आलेली आहे. नाट्यरसिकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य विभागाच्यावतीने करण्यात आले आहे.

## जलसंपदा मंत्र्यांची मैदानात फटकेबाजी; बुद्धिबळातही आजमावले कौशल्य

■ लोणी येथे राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेस उत्साहात प्रारंभ
■ मंत्र्यांच्या सक्रिय सहभागाने खेळाडू भारावले



महाराष्ट्र जीत

**शिर्डी :** शासकीय कामाच्या व्यापातून वेळ काढत अधिकाऱ्यांनी मैदानात गाजवलेले कसब व त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी खुद्द मंत्र्यांनीच हातात घेतलेली बॅट... अशा अत्यंत खेळीमेळीच्या व उत्साहपूर्ण वातावरणात शासनाच्या जलसंपदा विभागाच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांना लोणी बुद्रुक येथे शानदार सुरुवात झाली. विशेष म्हणजे जलसंपदा मंत्री (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) गिरीश महाजन व जलसंपदा मंत्री (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी प्रत्यक्ष मैदानात उतरून खेळात सहभाग नोंदवत खेळाडूंचा उत्साह द्विगुणित केला.प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या विविध क्रीडांगणांवर या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेमध्ये पुरुष व महिलांसाठी क्रिकेट, कबड्डी, बुद्धिबळ व जलतरण यांसारख्या विविध खेळांचा समावेश करण्यात आला आहे. स्पर्धेचा शुभारंभ केल्यानंतर दोन्ही मंत्र्यांनी केवळ औपचारिक हजेरी न लावता क्रिकेटच्या खेळपट्टीवर बॅटिंगचे कौशल्य आजमावले. तसेच बुद्धिबळाच्या पटावरही काही वेळ चाल खेळत बौद्धिक कौशल्याची चुणूक दाखवली.यावेळी मंत्री श्री. महाजन आणि मंत्री डॉ. विखे पाटील यांनी कबड्डीपटू व इतर स्पर्धकांशी संवाद साधून त्यांना शुभेच्छा दिल्या. “खेळांमुळे सांघिक भावना वाढीस लागते. निरोगी आयुष्यासाठी खेळाची नितांत गरज आहे. या स्पर्धांच्या माध्यमातून क्रीडा संस्कृतीला चालना मिळून प्रशासनात शिस्त व आरोग्यपूर्ण जीवनशैलीला प्रोत्साहन मिळेल,” असा विश्वास यावेळी मान्यवरांनी व्यक्त केला.याप्रसंगी जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, सचिव (लाभक्षेत्र विकास) संजय बेलसरे, प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुश्मिता विखे पाटील यांच्यासह विभागाचे वरिष्ठ अधिकारी, विविध जिल्ह्यांतून आलेले खेळाडू व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिल्हा परिषद-पंचायत समितीची निवडणूक चुरशीची; सोलापूरमध्ये प्रतिष्ठेच्या लढती

महाराष्ट्र जीत

**सोलापूर :** सोलापूर जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या प्रचाराचा धुरळा अखेर शांत झाला असून प्रचाराची अधिकृत सांगता झाली आहे. जिल्हा परिषदेच्या ६८ गटांसाठी आणि पंचायत समितीच्या १३६ गणांसाठी मतदान होत आहे. जिल्ह्यात अनेक ठिकाणी बहुकोनी लढती रंगल्या असल्या तरी माळशिरस, अक्कलकोट , बार्शी आणि मोहोळ या तालुक्यांकडे विशेष लक्ष लागले आहे.जिल्हा परिषद निवडणुकीत २७१ उमेदवार, तर पंचायत समिती निवडणुकीत ४८५ उमेदवार रिंगणात आहेत.



## विदेशी पर्यटकांची महाराष्ट्राला सर्वाधिक पसंती; वर्षभरात तब्बल ३७ लाखांहून अधिक फॉरेनर्सची भेट

महाराष्ट्र जीत

**नवी दिल्ली :** जगभरातून भारतात येणाऱ्या विदेशी पर्यटकांसाठी महाराष्ट्र हे देशातील सर्वाधिक पसंतीचे राज्य ठरले आहे.गेल्या तीन वर्षांत राज्यात येणाऱ्या परदेशी पर्यटकांच्या संख्येत दुपटीहून अधिक वाढ झाली आहे. सन २०२२ मध्ये महाराष्ट्रात १५ लाख परदेशी पर्यटकांनी भेट दिली होती, हा आकडा नंतर चांगलाच वाढला व २०२४ मध्ये तो ३७ लाखांहून अधिक झाला असल्याची माहिती केंद्रीय पर्यटन आणि सांस्कृतिक मंत्री गजेंद्र सिंह शेखावत यांनी राज्यसभेत एका लेखी प्रश्नाला उत्तर देताना दिली.



महाराष्ट्राची राजधानी मुंबई हे जागतिक आर्थिक केंद्र मानले जाते, तर देशाची आर्थिक राजधानी म्हणूनही मुंबईचा जगभरात लौकिक आहे. मुंबई पाहण्यासाठी, येथील पर्यटनासाठी जगभरातून पर्यटक येता असतात. मुंबईचे मार्केट असो किंवा, मुंबईचे प्रवेशद्वार असलेले ‘गेट वे ऑफ इंडिया’ असो. येथे पर्यटकांची मोठी गर्दी असते.

यासह, निसर्गरम्य कोकण, जगप्रसिद्ध अजंठा, वेरुळच्या लेण्या आणि ऐतिहासिक वारसा असलेले छत्रपती शिवाजी महाराजांचे गड - किल्ले हे पर्यटकांची पसंती असते. म्हणूनच, येथे पर्यटकांची मोठी गर्दी दिसून येते.




## सामाजिक कार्यातील धगधगता निखारा – प्रवीण पट्टेबहादूर

महाराष्ट्र जीत



समाजाच्या प्रवाहात काही व्यक्ती अशा असतात ज्या केवळ काळाबरोबर चालत नाहीत, तर काळालाच दिशा देतात. संघर्ष, सेवाभाव, विचार आणि कृती यांचा अद्भुत संगम म्हणजे प्रवीण पट्टेबहादूर. गेल्या पंधरा वर्षांपासून त्यांनी सामाजिक कार्याला केवळ उपक्रम न ठेवता, जीवनधर्म बनवले आहे.

**सेवेपासून नेतृत्वापर्यंतचा प्रवास**

सामान्य परिस्थितीतून पुढे येत, समाजातील वंचित, उपेक्षित व अल्पसंख्यांक घटकांच्या प्रश्नांना त्यांनी आपले कार्यक्षेत्र बनवले. अडचणी, विरोध, उपेक्षा या सर्वांवर मात करत त्यांनी सामाजिक कार्यात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली. त्यांचा प्रवास हा पदांचा नव्हे, तर जबाबदाऱ्यांचा आहे.

**राजा प्रसेंजित अल्पसंख्यांक बहुउद्देशीय संस्था – सामाजिक परिवर्तनाचे व्यासपीठ**

राजा प्रसेंजित अल्पसंख्यांक बहुउद्देशीय संस्था या संस्थेचे अध्यक्ष म्हणून त्यांनी शिक्षण, रोजगार, सामाजिक न्याय, जनजागृती आणि सक्षमीकरणाच्या माध्यमातून अनेक कुटुंबांच्या जीवनात बदल घडवून आणला. संस्था म्हणजे फक्त नाव नसून, ती समाजासाठी काम करणारी जिवंत चळवळ आहे, हे त्यांनी कृतीतून सिद्ध केले.

**नेहरू युवा केंद्र संघटन – युवक घडवणारा मार्गदर्शक**

नेहरू युवा केंद्र संघटनचे राष्ट्रीय युवा कोर म्हणून त्यांनी युवकांमध्ये नेतृत्व, स्वयंसेवा, राष्ट्रभक्ती आणि सामाजिक जबाबदारीची भावना निर्माण केली. युवक ही देशाची खरी ताकद आहे, हा विचार त्यांनी प्रशिक्षण, उपक्रम आणि प्रत्यक्ष कामातून रुजवला.

**समताशाही – विचारांची मशाल**

प्रवीण पट्टेबहादूर हे ‘समताशाही’ या विचारप्रवण मंचाचे संपादक आहेत. त्यांच्या लेखनातून समता, संविधान, बंधुता आणि सामाजिक न्यायाचे मूल्य प्रभावीपणे मांडले गेले आहे. त्यांची लेखणी ही केवळ शब्दांची नसून, विचार जागवणारी आणि दिशा देणारी आहे.

**यशदा प्रशिक्षक – अनुभवाचे विद्यापीठ**

यशदा (YASHADA) येथे प्रशिक्षक म्हणून त्यांनी सामाजिक कार्यकर्ते, प्रशासकीय अधिकारी व युवकांना प्रशिक्षण दिले. अनुभवातून आलेले ज्ञान, वास्तवाचे भान आणि मूल्याधिष्ठित दृष्टिकोन यामुळे त्यांचे प्रशिक्षण प्रेरणादायी ठरते.

**निखाऱ्यासारखे व्यक्तिमत्त्व**

प्रवीण पट्टेबहादूर यांना “धगधगता निखारा” म्हणण्याचे कारण स्पष्ट आहे. ते गाजत नाहीत, पण उजेड देतात. ते शांत असतात, पण समाजासाठी सतत पेटलेले असतात. अन्यायाविरुद्ध आवाज, दुर्बलांसाठी आधार आणि युवकांसाठी प्रेरणा – हेच त्यांच्या कार्याचे सार आहे.

**गौरव का करावा?**

कारण –

■ त्यांनी सामाजिक कार्याला सातत्य दिले
■ त्यांनी विचारांना कृतीची जोड दिली
■ त्यांनी समाजाला केवळ आश्वासन नव्हे, तर परिणाम दिले
■ त्यांनी पुढील पिढीसाठी मूल्यांचा वारसा ठेवला

**निष्कर्ष**

प्रवीण पट्टेबहादूर यांचे कार्य हे आजच्या समाजासाठी मार्गदर्शक आणि उद्याच्या पिढीसाठी प्रेरणास्थान आहे. अशा निखाऱ्यांच्या उष्णतेतूनच समाज घडतो, दिशा मिळते आणि परिवर्तन शक्य होते.हा गौरव केवळ व्यक्तीचा नसून, निःस्वार्थ सेवेच्या परंपरेचा सन्मान आहे.

दैनिक **महाराष्ट्र जीत** रविवार, ०८ फेब्रुवारी २०२६



# संपादकीय

## ध्वनिप्रदूषणाचा प्रश्न की धार्मिक अहंकार?

उत्तर प्रदेशातील प्रतापगडमध्ये मशिदींवरील भोंग्यांचा आवाज कमी करण्यावरून जे राजकारण तापले आहे, ते केवळ एका गावापुरते मर्यादित नाही. हा वाद आपल्या समाजातील धार्मिक अस्मिता पुढील पिढ्यांच्या आरोग्यावर आणि मानसिकतेवर किती खोल परिणाम करत आहेत, याची जाणीव करून देणारा आहे.

भारतामध्ये १९२९ साली ध्वनिवर्धकाचा प्रवेश झाला. सुरुवातीला तो सभा, संमेलने यापुरताच मर्यादित होता. पुढे सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक कार्यक्रम, मिरवणुका आणि उत्सवांमध्ये त्याचा वापर वाढत गेला. १९३० च्या दशकात मशिदींच्या मिनारांवर चारही दिशांना तोंड करून भोंगे लावले गेले. त्यानंतर मंदिरे मागे राहिली नाहीत. मंदिरांवरही भोंगे बसले आणि भजन-कीर्तनांचा आवाज परिसरात घुमू लागला. आजही मशिदींमधून दिवसातून पाच वेळा अजान दिली जाते. विशेष म्हणजे सुरुवातीच्या काळात काही मौलवींनी भोंग्यांना विरोध केला होता आणि त्याला ‘शैतानाचा आवाज’ असे संबोधले होते. मात्र कालांतराने हा विरोध मावळला आणि शहरांपासून अगदी दुर्गम खेड्यांपर्यंत भोंगे पोहोचले.

मशिदीतील अजान असो वा मंदिरातील भजन-कीर्तन, दोन्हीमुळे ध्वनिप्रदूषण होते हे नाकारता येणार नाही. म्हणूनच अनेक सुजाण नागरिक या भोंग्यांच्या अतिरेकाविरोधात आवाज उठवत आले आहेत. धार्मिक संघटना मात्र संविधानातील कलम २५ चा आधार घेत भोंग्यांचे समर्थन करतात. खरे तर हे कलम धर्मस्वातंत्र्य देते, पण ते सार्वजनिक सुव्यवस्था, नैतिकता आणि आरोग्य यांच्या अधीन आहे. म्हणजेच धार्मिक स्वातंत्र्याला मर्यादा आहेत. ध्वनिप्रदूषण आरोग्यास घातक आहे हे विज्ञानाने सिद्ध केलेले असताना, त्यावर नियंत्रण आणणे हे संविधानविरोधी नव्हे, तर आवश्यक ठरते.

मशिदींवरील भोंग्यांविरोधात १९९० च्या दशकात शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी स्पष्ट भूमिका घेतली होती. त्यानंतर राजकारणात धर्म अधिक ठळकपणे शिरल्यानंतर हा विषय कायम वादग्रस्त राहिला. मात्र मंदिरांवरील भोंग्यांविरोधात तसा तीव्र विरोध क्वचितच दिसतो. एकदा भोंग्याला धर्माचा रंग लागला की आवाजाची चढाओढ सुरू होते. आज ती इतकी विकृत झाली आहे की ध्वनिप्रदूषणाचा मूळ प्रश्न मागे पडला आहे. ‘आपले’ आणि ‘त्यांचे’ भोंगे अशी तुलना सुरू झाली आणि प्रदूषणालाही पक्षपाती मोजमाप लावले जाऊ लागले.

या संदर्भात न्यायालयांनी वेळोवेळी हस्तक्षेप केला आहे. २००० साली सर्वोच्च न्यायालयाने धार्मिक स्वातंत्र्याच्या नावाखाली ध्वनिक्षेपक वापरणे हे ‘अत्यावश्यक धार्मिक परंपरा’ मानता येत नाही, असे स्पष्ट केले. २००५ मध्ये रात्री दहा ते सकाळी सहा या वेळेत ध्वनिक्षेपकांवर बंदी घालण्यात आली. २०२० मध्ये अलाहाबाद उच्च न्यायालयाने अजान इस्लामचा अविभाज्य भाग असल्याचे मान्य केले, पण त्यासाठी ध्वनिक्षेपक आवश्यक नाही, असे ठामपणे सांगितले. कर्नाटकात २०२१ मध्ये सर्व बेकायदेशीर भोंगे काढण्याचे आदेश देण्यात आले आणि गेल्या वर्षी अनेक मशिदींवरील भोंगे उतरवण्यात आले. हे सगळे घडत असताना, देशासमोर इतके गंभीर प्रश्न असताना आपले राजकारण भोंग्यांभोवतीच का फिरते, असा प्रश्न पडतो.

निवडणुकीत अनेक उजव्या संघटना सत्तेत आल्यावर मशिदींवरील भोंग्यांवर बंदी घालण्याची आश्वासने देतात. मात्र सत्तेत आल्यानंतर सर्व धर्मस्थळांवरील भोंग्यांवर सरसकट बंदी घालणारा ठोस कायदा करण्यात आलेला नाही. उलट, प्रत्युत्तर म्हणून जवळपास प्रत्येक मंदिरावर भोंगे बसवले गेले आहेत. अनेक गावांमध्ये पहाटेपासून दोन-तीन तास मोठ्या आवाजात भजने-कीर्तने सुरू असतात. एका गावात चार-पाच मंदिरे असतील तर सर्वांचे भोंगे एकाच वेळी सुरू होऊन प्रचंड गोंगाट होतो. याविरोधात बोलण्याचे धाडस कुणी केले, तर त्याच्यावर धर्मविरोधी असल्याचा ठपका ठेवला जातो. विशेष म्हणजे अनेकदा त्या परिसरात मशीदही नसते.

# विश्वचषकावर आयुष म्हात्रेचा ठसा; वसई, विरारमध्ये आनंदोत्सव

महाराष्ट्र जीत

**पालघर :** झिम्बाबेतील 'हरारे स्पोर्ट्स क्लब'च्या ऐतिहासिक मैदानावर भारत आणि इंग्लंड यांच्यातील १९ वर्षांखालील विश्वचषक स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत भारतानं विजय मिळवला. या विजयात नालासोपाऱ्याच्या आयुष म्हात्रे याचा मोठा वाटा आहे. भारतीय संघाचं त्यानं नेतृत्व केलं. आयुष १९ वर्षांखालील विश्वचषक स्पर्धेत सहभागी झालेल्या भारतीय संघाचा कर्णधार होता. त्यानं गेल्या दोन वर्षांत आपल्या तळपत्या बॅटच्या मदतीनं धावांचा पाऊस पाडलाय. त्याचबरोबर गोलंदाजीच्या जोरावर आवश्यकतेच्या वेळी प्रतिस्पर्धी संघातील दिग्गज फलंदाजांना तंबूत पाठवलं आहे.



आयुष म्हात्रेची ही कामगिरी देशासाठी जशी महत्त्वाची आहे, तशीच ती वसई-विरार परिसरासाठी ही आहे. आयुष हा विश्वचषकाच्या रणांगणावर तळपणारा एक धगधगता तारा आहे. अफाट कष्टाच्या जोरावर त्याने मिळवलेले यश हे वसई, पालघरवासीयांसाठी एक आदर्श आहे. त्याच्या नेतृत्वाखाली भारतीय संघानं इंग्लंडला पराभूत केल्यानंतर संपूर्ण वसई, विरार, नालासोपारा आनंदोत्सवात न्हाऊन निघाला. लोकांनी मिरवणुका काढल्या. भारतीय झेंड्यासह युवक नाचत होते.

आयुषचा हा प्रवास निश्चितच सोपा नाही. शून्यातून विश्व निर्माण करण्याची ताकद ज्याच्या मनगटात असते, तोच जगाच्या नकाशावर आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवतो हे आयुषनं दाखवून दिलं. एकीकडं झिबाब्वेत भारत विश्वचषक उंचावत असताना दुसरीकडं मात्र वसई-विरार परिसर आपल्या भूमिपुत्राचा आनंदोत्सव तेवढ्याच उत्साहात साजरा करत होता. त्याचे आजोबा आणि आई-वडिलांना आयुषच्या कर्तृत्वाचा होणारा गौरव त्यांच्या चेहऱ्यावरून ओसंडून वाहत होता. नालासोपाऱ्यातील आपल्या नाळे गावाचं नाव जगाच्या नकाशावर सुवर्णक्षणांनी नोंद करणारा आयुष हा केवळ एक खेळाडू नाही, तर हजारो तरुण खेळाडूसाठी प्रेरणास्त्रोत बनला आहे.

विश्वचषकासारख्या मोठ्या व्यासपीठावर कर्णधारपदाची धुरा सांभाळणं ही भाग्याची गोष्ट असते. आयुषनं ती जबाबदारी केवळ पार पाडली नाही, तर आपल्या आक्रमक आणि चपळ शैलीची चुणूक दाखवत प्रतिस्पर्ध्यांना नमून त्यानं भारताचा तिरंगी झेंडा डौलानं फडकवला. ही आपल्या देशासाठी राज्यासाठी आणि आपल्या भूमीसाठी गौरवाची बाब आहे. अंतिम सामन्यात त्यानं इंग्लंड विरुद्ध ५३ धावांची अर्धशतकीय खेळी करून भारताला मजबूत सुरुवात करून दिली. त्यामुळंच भारतीय संघ चारशेच्या जवळपास पोहोचू शकला. प्रथम फलंदाजीचा निर्णय घेऊन आयुषनं आपला निर्णय किती योग्य होता हे दाखवून दिलं.

आयुषनं क्रिकेटच्या तिन्ही स्वरूपात प्रथम श्रेणी, लिस्ट आणि टी-२० मध्ये शतक झळकवणारा तो सर्वात तरुण खेळाडू ठरलाय. लखनऊच्या एकाना स्टेडियमवर विदर्भ विरुद्ध झालेल्या सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी सामन्यात त्यानं मुंबईकडून खेळताना ४९ चेंडू शतक झळकवलं. ५३ चेंडूत नाबाद ११० धावा करून आणि तेरा चेंडू शिल्लक असताना मुंबईला त्यानं विजय मिळवून दिला होता. तेव्हा तो फक्त १८ वर्षे आणि १३५ दिवसांचा होता. तिन्ही प्रकारात शतक करणारा तो सर्वात ठरला. यापूर्वी हा बहुमान रोहित शर्माच्या नावावर होता.

१९ वर्षांखालील भारतीय संघाचा कर्णधार आयुषनं इंग्लंडविरुद्धच्या दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेतही उत्कृष्ट फलंदाजी केली. तो या मालिकेत केवळ भारताकडूनच नव्हे, तर दोन्ही संघांमधील सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरला. इंग्लंड विरुद्ध पहिल्या आणि दुसऱ्या अशा दोन्ही कसोटी सामन्यांमध्ये आयुषनं शतक झळकवलं होतं.

आयुषनं दोन कसोटी सामन्यातील चार डावांमध्ये ३२८ चेंडूंचा सामना करत ३४० धावा चोपल्या. या कामगिरी दरम्यान त्याची सरासरी ८५ तर स्ट्राईक रेट १०३.६५ इतका होता. चार डावांमध्ये त्यानं दोन शतके आणि एक अर्धशतक झळकवलं. त्याची १२६ धावांची सर्वोत्तम खेळी दुसऱ्या कसोटी सामन्याच्या दुसऱ्या डावात साकारली.

# ठाणे मेट्रोसाठी अजून सहा महिन्यांची प्रतीक्षा

महाराष्ट्र जीत

**ठाणे :** ठाणे शहरासाठी सर्वाधिक उपयुक्त ठरणारी वडाळा-कासार वडवली ही मेट्रो ४ सुरू होण्याची डिसेंबरची डेडलाईन हुकली असून स्थानकांची कामे, गर्डर बसवण्याची कामे अद्यापही सुरू असल्याने ही मेट्रो सुरू होण्यास आणखी सहा महिने लागणार आहेत. भांडुप, कांजूरमार्ग भागात गर्डर बसविण्याचे काम मागील आठवड्यापर्यंत सुरू होते, याशिवाय याभागात मेट्रो स्थानकांची कामे अद्यापही सुरू आहेत. अद्यापही पूर्ण झालेली नाहीत. त्यामुळे ठाणे शहरवासीयांसाठी महत्वाची ठरणारी ही मेट्रो कामाच्या दिरंगाईमुळे लांबली आहे.

ही मेट्रो वडाळ्यावरून कासारवडवलीपर्यंत धावणार आहे. या मेट्रोवर वडाळ्यापासून कासारवडवलीपर्यंत जवळपास ११ स्थानके आहेत. ठाणे शहरवासीयांसाठी ही महत्वाची मेट्रो असून घोडबंदर भागात होणारी वाहतूक कोंडी आणि निम्मे शहरवासीय राहत असलेल्या भागातील चाकरमान्यांची होणारी दररोजची कोंडी या मेट्रोमुळे सुटू शकणार आहे. परंतु मेट्रोचे काम रेंगाळले असल्याने शहरवासीयांची मोठी कोंडी होताना दिसत आहे. ही मेट्रो मध्यरेल्वेच्या स्थानकांना जोडली जाणार आहे. दादर, भांडुप, कांजूरमार्ग ही मेट्रो जोडली जाणार असल्याने याचा मोठा फायदा रेल्वे प्रवाशांना होणार आहे.

ही मेट्रो वाहतुकीला महत्वाची असल्याने ठाणेकरांच्या सेवेत ती लवकर दाखल होईल, असे सांगत परीवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी प्रथम डिसेंबर नंतर १५ जानेवारीची मुदत दिली होती, मात्र ही डेडलाईन हुकली आहे.

मेट्रोची स्थानके नवीन डिझाईनची करण्यात आली असून स्थानकांच्या खाली एसटी परिवहन बसेसचा थांबा असणार आहे. मात्र या मेट्रोच्या निम्म्या स्थानकांचे काम बाकी आहे. त्यामुळे मेट्रोचे दोनवेळचे मुहुर्त हुकले आहेत. या मेट्रोवर तीन हात नाका, आरटीओ ठाणे, महापालिका मार्ग, कॅडबरी जंक्शन, माजीवडा, कापूरबावडी मानपाडा, टिकुजी-नी-वाडी, डोंगरी पाडा, विजय गार्डन, ओवळा ही स्थानके आहेत. तर मुंबईकडे मुलुंड, भांडुप, कांजूरमार्ग, विक्रोळी, घाटकोपर, कुर्ला, माटुंगा, दादर, वडाळा अशी स्थानके असणार आहेत. ही मेट्रो लवकर सुरू व्हावी यासाठी प्रवाशांची मागणी आहे.

# वीजबिलाचा भार उतरवण्यासाठी झेडपी शाळांकडे ‘सौरऊर्जेचा’ मार्ग

महाराष्ट्र जीत

**ठाणे :** ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात आजही विजेचा लपंडाव कायम असून निधीअभावी अनेक जिल्हा परिषद शाळांचा वीजपुरवठा वारंवार खंडित होत आहे. वीजदेयके थकित राहिल्याने काही ठिकाणी थेट मीटर काढून नेण्याचे प्रकार घडत असल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर त्याचा प्रतिकूल परिणाम होत होता. या पार्श्वभूमीवर ठाणे जिल्हा परिषद प्रशासनाने ग्रामीण भागातील शाळांचे टप्प्याटप्प्याने सौरऊर्जीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे.



या निर्णयानुसार पहिल्या टप्प्यात जिल्हा परिषदेच्या १३७ शाळांवर सौरऊर्जा प्रकल्प बसविण्यात येणार असून त्यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात आली आहे. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार असून संबंधित शाळा लवकरच सौरप्रकाशाने उजळणार आहेत.

ग्रामीण भागातील अनेक शाळांना वार्षिक वीजबिलाचा मोठा आर्थिक भार सहन करावा लागत होता. याचे ठळक उदाहरण म्हणजे मुरबाड तालुक्यातील मिल्हे येथील जिल्हा परिषद शाळा. पहिली ते चौथीपर्यंतचे वर्ग असलेल्या या शाळेत सुमारे ५० विद्यार्थी शिक्षण घेत असून, वर्षाला २२ ते २३ हजार रुपयांपर्यंत वीजदेयक येत होते. वीजबिल न भरल्याने वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रकार वारंवार घडत होते.

याच समस्येवर उपाय म्हणून महावितरणच्या नेट मीटरिंग योजनेअंतर्गत या शाळेत सौरऊर्जा प्रकल्प उभारण्यात आला. मिल्हे गावात बंद अवस्थेत पडून असलेल्या सौरऊर्जा प्रकल्पातील आठ सोलर प्लेट्स शाळेत बसवून हा प्रयोग करण्यात आला.

या प्रयोगामुळे वीजबिलाचा प्रश्न सुटला असून शाळेतील वीजपुरवठा अखंडित राहू लागला आहे. भविष्यात प्रशासकीय इमारतींनाही लाभ सौरऊर्जा प्रकल्प केवळ शाळांपुरते मर्यादित न ठेवता भविष्यात शासकीय इमारती, रुग्णालये, ग्रामपंचायत कार्यालये याठिकाणीही बसविण्याचे नियोजन असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

# केडीएमसी महापौरांनी अधिकाऱ्यांसमवेत केली महापौर निवासाची पाहणी

- महापौर निवासस्थानाची होणार लवकरच डागडुजी
- केडीएमसी प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे करदात्या नागरिकांच्या पैशांचा चुराडा

महाराष्ट्र जीत

**कल्याण :** कल्याण डोंबिवली महानगरपालिका निवडणुकीनंतर महापौरांची निवड देखील झाली आहे. मात्र महापौरांसाठी महापालिकेच्या वतीने बांधण्यात आलेल्या महापौर निवासस्थानाची दुरावस्था झाली आहे. गेली कित्येक वर्षे हा बंगला बंद असल्याने वाळवी लागली आहे. या महापौर निवासस्थानाची आज केडीएमसी महापौर हर्षाली चौधरी थविल यांनी शहर अभियंता अनिता परदेशी, अतिरिक्त शहर अभियंता जगदीश कोरे, प्रशांत भागवत, शिवसेना गटनेते विश्वनाथ राणे यांच्यासह पाहणी केली.

कल्याण पश्चिमेतील आधारवाडी जेल परिसरात २०१० साली जनतेचे लाखो रुपये खर्च करून हे महापौर निवासस्थान बांधण्यात आले होते. मात्र, या निवासस्थानाला जाण्यासाठी रस्ता नसल्याने तसेच इतर वादामुळे हे निवासस्थान सुरुवातीपासूनच चर्चेत राहिले. बांधकामानंतर अनेक वर्षे हा बंगला वापराविना ओस पडून होता. यानंतर पुन्हा लाखो रुपये खर्च करून बंगल्याची डागडुजी करण्यात आली. मात्र,



तत्कालीन महापौरांनी केवळ बंगल्याची पूजा करून त्यामध्ये वास्तव न करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे पुन्हा एकदा हा बंगला वापरात आला नाही. कोरोना काळापासून तर हा बंगला पूर्णपणे बंद अवस्थेत असून, देखभालीअभावी त्याची अवस्था अधिकच बिकट झाली आहे.

सध्या बंगल्यातील संपूर्ण लाकडी फर्निचर खराब झाले असून, अनेक ठिकाणी वाळवीचा प्रादुर्भाव झाल्याचे दिसून येत आहे. नियमित देखभाल व संरक्षण न केल्यामुळे महापौर निवासस्थानाची मोठ्या प्रमाणावर नासधूस झाली



आहे. केडीएमसी प्रशासनाने या बंगल्याकडे सातत्याने दुर्लक्ष केल्याने पुन्हा एकदा दुरुस्तीसाठी जनतेच्या लाखो रुपयांची उधळपट्टी होणार आहे. या या निवासस्थानाची पाहणी करण्यात येऊन लवकरच या निवासाच्या डागडुजीचे काम हाती घेण्यात येणार असल्याचे शहर अभियंता अनिता परदेशी यांनी सांगितले.

दरम्यान महापौर हर्षाली चौधरी थविल या सद्ध्या मोहने येथे भाड्याच्या घरात राहत असून, महापौर निवासस्थानाची डागडुजी लवकर झाल्यास कल्याणमध्ये महापौर निवासस्थानी राहून नागरिकांच्या कामासाठी जास्तीत जास्त वेळ देता येईल.

# ठाणे जिल्हा परिषदेच्या विद्यार्थ्यांची ‘इस्त्रो’ ला झेप

महाराष्ट्र जीत

**ठाणे :** ठाणे जिल्ह्याच्या शहापूर तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांमधील दहा विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरावर झालेल्या मिशन भरारी अंतर्गत परिक्षेत घवघवीत यश संपादन केले. त्यामुळे या विद्यार्थ्यांना विमानवारी करुन भारतीय अंतराळ संशोधन संस्था ‘इस्त्रो’ येथे जाण्याची संधी मिळाली आहे. या विद्यार्थ्यांचे सर्वच स्तरातून कौतूक करण्यात आले.

ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातही विद्यार्थ्यांमध्ये सुप्त गुण दडलेले असतात. आशा गुणवान विद्यार्थ्यांना वाव देण्यासाठी ठाणे जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ आणि ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यात अनोख उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमात जिल्हास्तरावर मिशन भरारी अंतर्गत परिक्षा घेण्यात आली होती. यामध्ये जिल्हापरिषद शाळेतील इयत्ता पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. केंद्र स्तर, तालुका स्तर आणि त्यानंतर जिल्हास्तर अशा तीन टप्प्यात ही परिक्षा पार पडली.

या परिक्षेत शहापुर तालुक्यातील शेलवली (बांगर), आस्नोली, आष्टे, मुगाव, खराडे व धसई या सहा जिल्हापरिषदेच्या शाळेतील इयत्ता आठवी



मधील स्नेहल संतोष बांगर, जिया शरद हलपतराव, काव्या अजय दाखले, सातवी मधील साई जयवंत निमसे, अक्षदा दत्तात्रय दिनकर, ईश्वरी रमेश विशे, सहावी मधील आरुष शशिकांत दिनकर, वैष्णवी प्रवीण बोन्द्रे आणि पाचवी मधील जितेंद्र रवी करण व आर्यन दिनेश वरकुटे या दहा विद्यार्थ्यांनी प्रथम केंद्रस्तरावर, नंतर तालुकास्तरावर आणि ३१ जानेवारीला पार पडलेल्या जिल्हास्तरावरील मिशन भरारी परिक्षेत घवघवीत यश संपादन करुन ‘इस्त्रो’ मध्ये झेप घेतली आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विज्ञान, संशोधन आणि अंतराळ तंत्रज्ञानाच्या मुख्य प्रवाहात आणून ‘भारताचा पुढचा शास्त्रज्ञ तुमच्यातच आहे’ हा विश्वास त्यांच्या मनात रोवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

महाराष्ट्र जीत हे दैनिक वृत्तपत्राचे संपादक सागर रामदास अंभोरे यांनी महामाया प्रिंटिंग प्रेस श्रीराम अपार्टमेंट गणेदिवाल लेआउट भाग्य नगर, अमरावती,महाराष्ट्र-४४४६०२ येथे मुद्रीत करुन दैनिक महाराष्ट्र जीत कार्यालय घर क्रमांक ८९, प्रियदर्शनी कॉलनी, बायपास प्रभाग क्रमांक ८ कारंजा, वाशिम, महाराष्ट्र - ४४४१०५. येथे प्रकाशित केले. मो.९९२१०४५१२१ / ९६०४४३०००२ (सर्व वाद कारंजा लाड न्यायालयाअंतर्गत) (याआवृत्तीमधील सर्व जबाबदारी संपादकावर राहिल)




# नवसमाजाची आशादायक पुनर्रचना

**आज सर्वांचीच सकाळ सुरू होते ती मोबाईलच्या अलार्मपासून. डोळे उघडल्यानंतर आपल्या हातात मोबाईल असतो, तो रात्री झोपेपर्यंत. या मोबाईलच्या माध्यमातून आपण फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्राम, यूट्यूब आणि सर्वांच्या सर्वाधिक जवळचं माध्यम म्हणजे व्हॉट्सअॅप, याशिवाय मेलसाठीचे विविध प्लॅटफॉर्म, ही यादी खूप मोठी आहे. मुख्यत: ज्यांना आपण सोशल मीडिया म्हणतो ते ही नवमाध्यमे आहेत. मुख्यत: यांचा वापर हा संवादासाठी आहे. आता ही माध्यमे अभिव्यक्तीचे साधन बनली आहेत. त्यांच्या माध्यमातून नवसमाजाची पुनर्रचना होत आहे.**

महाराष्ट्र जीत

डिसेंबर-जानेवारी-फेब्रुवारी हे महिने साहित्य क्षेत्रातील घडामोडींचे असतात. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनापासून जिल्हास्तरीय संमेलनांची या महिन्यांमध्ये रेलचेल असते. मुंबईत सध्या काळा घोडा फेस्टिव्हल सुरू आहे. या फेस्टिव्हलमध्ये हस्तकलेपासून एआय तंत्रज्ञानापर्यंतची चर्चा आणि कला दिसत आहे. त्यासोबतच साहित्यिक चर्चादेखील होत आहे. विविध पुस्तकांवर सांगोपांग चर्चा होत आहे. गिरगावमध्ये महानगर मराठी साहित्य संमेलन झाले. मंचावर लोकल डब्याची नैपथ्यरचना करण्यात आली होती. महाराष्ट्राच्या विविध भागांमध्ये ग्रामीण, विद्यार्थी, शिक्षक, कुमार, महिला, आदिवासी असे विविध साहित्य प्रवाह वाहत आहेत. अखिल भारतीय साहित्य संमेलनाला समांतर विद्रोही साहित्य संमलेन हा एक वैचारिक एल्गारच आहे. यंदाचे २०वे विद्रोही साहित्य संमेलन या महिन्याच्या शेवटी नांदेड येथे होणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुरू केलेल्या मूकनायक वृत्तपत्राचा ३१ जानेवारी रोजी १०६वा वर्धापन दिन साजरा झाला. या वृत्तपत्राच्या माध्यमातून दबलेल्या, पिचलेल्या, वंचित, शोषित समाजाला आपला आवाज मिळाला. आपलाही काही आतला आवाज असू शकतो याचे आत्मभान मिळाले. त्याचे मूर्तरुप म्हणजे गावागावात होणारी ही छोटेखानी संमेलने. आज ही साहित्य संमेलने होत असली तरी नवमाध्यमातूनही अर्थात सोशल मीडियातूनही हा आवाज बुलंद होत आहे. विद्रोही साहित्याच्या प्रांतात नवमाध्यमाच्या रुपाने काय सुरू आहे, यातून नव्या समाजाची पुनर्रचना कशी होत आहे, त्याचाच हा धांडोळा.

विद्रोही साहित्य म्हणजे फक्त विरोधाला विरोध नाही, तर वैचारिक कृतीशील विरोध. स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, समाजवाद, धर्मनिरपेक्षता, शांतता, अहिंसा या भारतीय संविधानातील मूलतत्वांचा समुच्चय ज्या साहित्यात असेल असे सकलजनांचा बौद्धिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय उत्कर्षाचा उद्घोष करणारे साहित्य. हा विद्रोह श्रमिक, कष्टकरी, शेतकरी, शेतमजूर, कामगारांचा, गरीब, वंचित, मध्यमवर्गीय, कारखान्यातील मजूर, हातगाडी चालवणारा, हमाल, कंपनीतील कर्मचारी, टॅक्सी-रिक्षाचालक, शिक्षण घेऊन बेकार राहणारा बेरोजगार आणि जगणे हीच ज्याच्यासाठी समस्या झाली अशा जनतेसाठी लिहिणारे कवी, कथा कादंबरीकार, कलाकार, चित्रकार, शिल्पकार, पत्रकार यांच्या अभिव्यक्तीला प्रेरणा देणारे हे साहित्य संमेलन. काळासोबत या साहित्याचीही भाषादेखील बदलत चालली आहे. ७०च्या दशकात दया पवार, राजा ढाले, नामदेव ढसाळ, प्रल्हाद चेंदवणकर, बाबुराव बागूल, ज.वी.पवार हे ज्या पार्श्वभूमीतून आले ती त्यांच्या विरोधाची-साहित्याची भाषा होती. आता लोकनाथ यशवंत यंदाच्या विद्रोही साहित्य संमेलनाचे अध्यक्ष आहेत. प्रतिगामी, मुलतत्त्ववादी, भांडवलशाहीला आव्हान देण्याची भाषा आणि माध्यमे आता बदलत चालली आहेत.

विद्रोही, आंबेडकरी तरुण-तरुणी आता फक्त अस्मिता आणि अस्तित्वाच्या लढाईत अडकलेले नाहीत. ते आजच्या माध्यमांशी जुळवून घेत नवमाध्यमाची भाषा बोलू लागले आहेत. आज सर्वांचीच सकाळ सुरू होते ती मोबाईलच्या अलार्मपासून. डोळे उघडल्यानंतर आपल्या हातात मोबाईल असतो, तो रात्री झोपेपर्यंत. या मोबाईलच्या माध्यमातून आपण फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्राम, यूट्यूब आणि सर्वांच्या सर्वाधिक जवळचं माध्यम म्हणजे व्हॉट्सअॅप, याशिवाय मेलसाठीचे विविध प्लॅटफॉर्म, ही यादी खूप मोठी आहे. मुख्यत: ज्यांना आपण सोशल मीडिया म्हणतो ते ही नवमाध्यमे आहेत. मुख्यत: यांचा वापर हा संवादासाठी आहे. आता ही माध्यमे अभिव्यक्तीचे साधन बनली आहेत.

९०च्या दशकात वृत्तपत्र, मासिके आणि टीव्ही एवढीच माध्यमे होती ती समाजमनावर परिणाम करणारी होती आणि आजही आहेत. मात्र आता माहितीच्या महाजालातील नवमाध्यमांनी मन-मस्तिष्कावर ताबा मिळवलेला आहे. या माध्यमांमुळे संवादाची पद्धत बदलली आहे. या माध्यमांद्वारे माहितीचं भंडार जसं खुलं होत आहे, तसंच एक संस्कृतीदेखील जपली जात आहे. कितीही नाकारलं तरी प्रतिगाम्यांनी या माध्यमांवर आधीच ताबा मिळवलेला आहे. या माध्यमांचा अल्गोरिदम सेट असतो. तुम्ही ज्या विचारसरणीच्या पोस्ट, व्हिडिओ पाहण्याचे चाहते असाल, यूट्यूब, फेसबुक, ट्विटरवर तुम्हाला त्याच विषयासंबंधीचा कंटेंट तुमच्या मोबाईल स्क्रिनवर वारंवार येत राहील. तुम्हाला तेवढ्यामध्ये अडकवून ठेवण्याचे षड्यंत्र या नवमाध्यमांचे आहे. ही एक प्रकारची तुमच्या विचारांना कोंडीत पकडणारी, तुमच्या विचारविश्वाला कुंठित करणारी बाब आहे, त्या दृष्टीनेही या नवमाध्यमांकडे पाहणे गरजचेचे आहे. तुम्हाला दुसरा विचार करण्याची संधी हे माध्यम फारशी देत नाहीत. हा एक प्रकारे विशिष्ट संस्कृती लादण्याचाच प्रकार आहे. यातून आपला संवाददेखील त्याच अंगाने वाढत जातो. तशाच प्रकारचा विचार करणारे लोक आपल्याला तिथे भेटत जातात. याला कितीही ग्लोबल व्हिलेज म्हणून आपण गोंजारण्याचा प्रयत्न करत असू, मात्र एक प्रकारे हे समाजाला, विचारांना बंदिस्त करणे आहे. एक प्रकारचे घेट्टो तयार करण्याचे हे षड्यंत्र आहे. ते मोडून काढण्याची गरज आहे. संस्कृतीला छेद देणं हेच तर विद्रोही, आंबेडकरी संवादशास्त्र आहे. तथागत बुद्धांनी तत्कालिन संस्कृतीच्या विरोधात बंड केलं. स्वत:चं वेगळं संवादशास्त्र निर्माण केलं. त्यातून बौद्धदर्शन तयार झाले. मुंबईतील बोरीवलीची कान्हेरी लेणी, एलिफंटा, अजिंठा, वेरुळ हे येथील खरे सौंदर्यशास्त्र आणि आपली संत परंपरा ही विद्रोही संवादशास्त्र आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ३१जानेवारी १९२० रोजी सुरू केलल्या ‘मूकनायक’ या पाक्षिकावर संत तुकाराम यांच्या अभंगातील, काय करूं आता धरुनिया भीड। निःशंक हे तोंड वाजविलें॥ नव्हे जगी कोणी मुकीयांचा जाण। सार्थक लाजून नव्हे हित ॥ या ओळी घोषवाक्यासारख्या वापरल्या होत्या. अशा पद्धतीने डॉ. बाबासाहेबांनी विद्रोहाच्या परंपरेची सांगड घालून दिली. यानंतरची त्यांच्या वृत्तपत्रांची नावे पाहिली तर बहिष्कृत भारत, समता, जनता आणि प्रबुद्ध भारत (४ फेब्रुवारी १९५६) हा नावात होणारा बदल विद्रोही-आंबेडकरी संवादशास्त्राचा भाग आहे. हे साहित्य वैयक्तिक कल्याणाचं, व्यक्तिगत, स्वांत सुखाय नाही, तर जगाच्या कल्याणाचा हुंकार राहिलेलं आहे.

हीच प्रेरणा घेऊन नवमाध्यमांचा वापर सध्याची पिढी आणि तरुणाई करत आहे. आंबेडकरनामा यूट्यूब चॅनल चालवणारे प्रोफेसर रतन लाल, डॉ. लक्ष्मण यादव, आजरा आणि सुमीत चव्हाण, अंजुल, यांची भाषा ही नवमाध्यमाची आहे. प्रोफेसर दिलीप मंडल यांचा नवमाध्यमात आंबेडकरी विचार रुजवण्यात मोठा वाटा राहिलेला आहे, मात्र मागील काही वर्षांपासून त्यांनी उजव्या विचारसरणीचा पदर धरल्याचा त्यांच्यावर आरोप होत आहे. माध्यमशास्त्राचे अभ्यासक असल्यामुळे त्यांनी या नवमाध्यमातून विद्रोही आणि आंबेडकरी संवादशास्त्र अधिक विकसित केले. त्याचा विस्तारदेखील केला हे नाकारून चालणार नाही. नवमाध्यम वापरकर्त्यांनी ज्या पद्धतीने मंडल यांना डोक्यावर घेतले होते, तेवढेच त्यांना आता ट्रोलदेखील केले जात आहे. याशिवाय मराठीमध्ये आघाडीचे नाव आहे वैभव छाया. नवमाध्यमांची अचूक जाण आणि त्यांचा प्रभावी वापर आपल्या हक्क, अधिकारांसाठी करताना वैभव छाया दिसतो. सर्वच सोशल मीडियावर सक्रियता आणि त्यातून आपलं मत ते मांडतात आणि बहुजनांना जागृतदेखील करतात. हेच काम हिंदीमध्ये क्रांती कुमार, जॅकी यादव करत आहेत. नागपूरमधील ब्ल्यू बर्ड्स हा देखील महत्त्वाचा ग्रुप आहे. यांनी बहुजन-आंबेडकरवादी उद्योगांना एका छताखाली आणण्याचे काम केले आहे. हे नवमाध्यमांमुळे शक्य झाले आहे. जातीविरहित समाजाची पुनर्रचना हे या साहित्य आणि संवादशास्त्राचे मूळ आहे.

मुख्य प्रवाहाच्या मुद्रित आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांमध्ये अजूनही दलित, शोषित, वंचितांच्या प्रश्नांना, आंदोलनांना पाहिजे तेवढी जागा मिळत नाही, हे वास्तव आहे. ती स्पेस, ती जागा आता नवमाध्यमांच्या माध्यमातून तयार केली जात आहे. शक्य आहे त्या भाषेत, लहेजात बोलण्याची येथे मुभा आहे. आदिवासी तरुण-तरुणी त्यांच्या शैलीत, बोलीभाषेत या माध्यमातून व्यक्त होताना दिसतात. मराठवाड्यातील तरुण कवी वीरा राठोड यांनी त्यांच्या लमाण-बंजारा संस्कृतीला आपल्या साहित्यातून समोर आणले. त्यांच्या ‘सेनं सायी वेस’ या कवितासंग्रहाला २०१५चा साहित्य अकादमीचा युवा पुरस्कार मिळाला. महाराष्ट्राचे लाडके साहित्यिक पु.ल. देशपांडे हे त्यांच्या ‘ती फुलराणी’ नाटकातून सांगतात की ‘नव्हतं हे अशुद्ध नाही, तर ‘व्हतं’ हा शब्द कसा काय अशुद्ध ठरतो. हे शुद्ध-अशुद्धतेचे सोवळे या नवमाध्यमामुळे गळून पडत आहेत.

प्रमाण-अप्रमाणची सीमारेषा यामुळे धुसर होत आहे. ग्रामीण-शहरी हा भेद अजून मिटला नसला तरी हे साहित्य आता त्याच्या पलीकडे जात आहे. नवमाध्यम हे स्वातंत्र्य तुम्हाला देत आहे की, येथे तुम्ही तुमच्या भाषेत तुमच्या वेदना, पीडा, प्रश्न मांडू शकता. भांडू शकता आणि नव्या समाजाची पुनर्रचना करू शकता.

# जाहिरातींच्या मोहजाळाणे व्याधीग्रस्तांची फसवणूक!

महाराष्ट्र जीत

तुमच्या गुडघ्यात प्रचंड वेदना होत आहेत? चालताना कटकट असा आवाजही येतोय? कंबरदुखीही आहे? मग या सर्व समस्यांवर आमचे अमुक तमुक औषध हाच एकेमव उपाय, अकाली केस पांढरे होत आहेत? केसही गळताहेत? टक्कल पडतयं? मग फक्त आमचं तेल तुमच्या या सर्व समस्या दूर करेल, वजन वाढलयं? मग जीमला न जाता, डाएट न करता आमचा फक्त एक कप चहा प्या आणि वजन कमी करा. या आणि अशाच आशयाच्या जाहिराती सेलिब्रिटी टीव्हीवर, रिलवर करत असल्याचे बघतच आता प्रत्येकाची सकाळ होत आहे. या जाहिरातींचा प्रभाव जनमानसावर इतका होत आहे की या जाहिरातींवर विश्वास ठेऊन अनेकांचे खिसे रिकामे होत आहेत तर या जाहिरातींमध्ये उत्तम आरोग्य सेवा देण्याचा दावा करणाऱ्या बोगस कंपन्या मात्र आपले खिसे भरत आहेत.

थोडक्यात काय तर आरोग्य सेवा देण्याचा दावा करणाऱ्या आकर्षक जाहिरातींमधील कंपन्यांच्या, संस्थांच्या औषधांची कोणतीही शहानिशा न करता आंधळेपणाने विश्वास ठेवणे धोकादायक आहे. ग्राहकांची दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींना आळा घालण्यासाठी १९८५ साली (ASCI) अॅडव्हर्टायझिंग स्टॅण्डर्ड कौन्सिल ऑफ इंडियाची स्थापना करण्यात आली. यामुळे या भारतीय जाहिरात मानक परिषदेकडे अशा प्रकारे दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींविरोधात तक्रारींचा पाऊस पडत आहे. कारण जाहिराती खऱ्या समजून आरोग्य सेवा घेणाऱ्यांची फसवणूक झालेली आहे. विविध उत्पादनांची, कंपन्यांची, शैक्षणिक संस्थांची, आरोग्य सेवा देणाऱ्यांची माहिती जाहिरातीच्या माध्यमातून अधिकाधिक जनतेपर्यंत पोहचवण्याचे काम जाहिरात कंपन्या सोशल मीडियाच्या माध्यमातून करत असतात. पण गेल्या काही वर्षात विविध क्षेत्राच्या तुलनेत उत्तम आरोग्य सेवा देण्याचा दावा करणाऱ्या कंपन्यांचा, उपचार केंद्रांचा, जाहिरातींचा आकडा सर्वाधिक आहे. कारण या जाहिरातींमधील उत्पादन, उपचारांचा संबंध थेट ग्राहकांच्या आरोग्याशी असल्याने ग्राहक या जाहिरातींना गांभीर्याने घेतात.

यातील बोटावर मोजणाऱ्या संस्था, कंपन्या खऱ्या अर्थाने ग्राहकांना योग्य आरोग्य सेवा देत आहेत. तर काही मात्र फक्त ग्राहकांच्या



मानसिकतेचा, अज्ञानाचा गैरफायदाच घेत आहे. यात प्रामुख्याने स्थूल, गुडघेदुखीने त्रस्त, मधुमेह, बीपी, थायरॉईड, वंध्यत्व असणाऱ्या व्यक्ती अशा जाहिरातींना बळी पडत असल्याचे समोर आले आहे. कोरोनानंतर सगळेच आरोग्याप्रती जागरूक झाले आहेत. याचाच गैरफायदा घेत अनेकांनी आरोग्य सेवेच्या नावाखाली आपली दुकानं सुरू केली आहेत. यात प्रामुख्याने सध्याच्या बिझी लाईफस्टाईलमुळे स्थूलता, गुडघेदुखीने, मधुमेह, बीपी, थायरॉईड, वंध्यत्व अशा विविध आरोग्याशी संबंधित समस्यांनी त्रस्त व्यक्तींना डोळयासमोर ठेऊन आकर्षक जाहिराती तयार करण्यात येत आहेत. पण उपचार घेतल्यानंतरही आराम मिळत नसल्याने किंवा रिझल्ट मिळत नसल्याने संबंधित कंपन्यांना याबाबत जाब विचारता अजून काही दिवस उपचार घेण्याचा सल्ला देत ग्राहकांकडून अधिकाधिक पैसे उकळण्याचा धंदाच या कंपन्यांनी, सेंटर्सनी सुरू केला आहे. यामुळे जाहिरातीत कंपन्यांनी केलेला दावा फोल असल्याचे लक्षात आल्यानंतर ग्राहक या खोट्या जाहिरातींची तक्रार (ASCI) अॅडव्हर्टायझिंग स्टॅण्डर्ड कौन्सिल ऑफ इंडियाकडे करत आहेत. विशेष म्हणजे यात उपचारासाठी लाखो रुपये खर्च करूनही आजाराची स्थिती जैसे थे वैसेच असल्याचे अनेकांनी अनुभव शेअर करताना सांगितले आहे.

यावर नक्की दोष कोणाला द्यावा हा देखील प्रश्न आहे. कारण आपल्याकडे अॅलोपथी औषधांचे दुष्परिणाम सांगून या कंपन्या, उपचार सेंटर रुग्णाला असे काही घाबरवतात की तो अॅलोपथीचा, ऑपरेशनचा धसकाच घेतो. हीच वेळ साधत मग आमच्या उपचारांचे कोणतेही साईड इफेक्ट्स नाहीत असे सांगून रुग्ण व त्याच्या कुटुंबाचे मन वळवण्यात या सेंटरचे डॉक्टर आणि स्टाफ यांना यश मिळते. आधीच व्याधीने त्रस्त असलेल्या व्यक्तीला लवकरात लवकर आराम कसा मिळेल याची घाई असते. अनेक दिवसांपासून, महिन्यांपासून दुखणे सहन करता करता आधीच तो वैतागलेला असतो. अशावेळी आमच्या उपचारांनी, औषधांनी, थेरपींनी तुम्ही काही दिवसातच ठणठणीत व्हाल हे शब्दच त्याच्यात नवीन उमेद जागवत असतात. पण यावेळी सुजाण नागरिक म्हणून आपणही अशा प्रकारे उपचारांचा, औषधांचा दावा करणाऱ्या या कंपन्यांची योग्य पद्धतीने माहिती मिळवणे गरजेचे आहे.

कारण बऱ्याचवेळा फक्त पैसे उकळण्यासाठी रुग्णाच्या मानसिकतेबरोबर खेळ करणाऱ्या या आरोग्य सेवेच्या उपचारपद्धती एखाद्याच्या जीवावरही बेतू शकते. यामुळे सतत जाहिरातीत झळकणाऱ्या उत्कृष्ट आरोग्य सेवा देण्याचा दावा करणाऱ्या उपचारपद्धती घेण्याआधी त्याचा तुम्हाला कितपत लाभ होणार आहे हे देखील पाहावे. कारण शरीर आजारी पडते तेव्हा मनही आजारी होतेच. शरीराचा मनावर आणि मनाचा शरीरावर परिणाम होतच असतो. त्यामुळे अगदी सर्दी खोकल्यापासून ते एखाद्या दुर्लभ आजाराचा परिणाम व्यक्तीच्या व्यक्तिमत्वावर होताना आपण पाहत असतो. यामुळे फक्त जाहिरात बघताना त्यात दाखवण्यात येणारे प्रसंग हे स्क्रिप्टवर आधारित आहे हे आधी मनाला सांगावे.

कारण एखाद्या आजाराशी, प्रसंग, घटनेशी साम्य असलेल्या गोष्टी जर आपल्या आयुष्यातही होऊन गेलेल्या असतील किंवा होत असतील तर आपण लगेच त्याबरोबर जोडले जातो. पण ही एक उत्पादन विकण्याची मार्केटिंग स्ट्रॅटेजी आहे हे सामान्य जनतेला कळत नाही. उदाहरणार्थ, जसे की रोज सकाळी काही ठराविक चॅनेल्सवर गुडघेदुखी, सांधेदुखीवरील उपचाराची जाहिरात झळकत असेल आणि जर त्याच व्याधीने तुम्ही किंवा तुमच्या घरातील, माहितीतील व्यक्तीही त्रस्त असेल तर आपण लगेच त्या जाहिरातीशी कनेक्ट होतो आणि नकळत त्या जाहिरातीमध्ये देण्यात आलेल्या फोन क्रमांकावर कॉल करून चौकशी करतो आणि कसलीही शहानिशा न करता ते सांगतील त्यावर विश्वास ठेवून पैसे भरतो आणि उपचार सुरू करतो. हीच सायकल अशीच सुरू राहते. कंपनीला ग्राहक मिळतो.

सुरुवातीचे दिवस तुम्हाला बरे वाटते. काहींना कायमचा आरामही मिळतो. पण ज्यांना मिळत नाही त्यांचे हे उपचाराचे चक्र थेरपीच्या नावाखाली वर्षानुवर्ष सुरू राहते. पैसा जात राहतो. बँक खाते रिकामे होत राहते, त्याचवेळी कंपनीचा गल्ला भरत राहतो. शेवटी ज्यावेळी या उपचारांना अर्थ नाही हे लक्षात येतं तेव्हा ग्राहक (ASCI)कडे जाहिरातीतील प्रलोभनांना बळी पडून आम्ही कसे फसलो याची कैफियत सांगत आहेत. यामुळे (ASCI) ही अशा प्रकारच्या घटनांची गंभीर दखल घेतली असून आरोग्य सेवेवरील जाहिरातींसाठी कडक नियम अटी शर्थी लागू केल्या आहेत. त्याबद्दल प्रत्येक नागरिकाने सतर्क राहाणे गरजेचे आहे.

अनेक लोक आपल्या व्याधींवर जाहिरातींमधून मिळणारा मार्ग हा सोपा आणि स्वस्त समजतात. कारण त्यामुळे खर्च वाचतो, असे त्यांना वाटते. पण काही वेळा ते भलतेच महागात पडू शकते. एखादी व्यक्ती जाहिरात बघून ते औषध घेतो, त्याला आराम पडतो, त्यामुळे जेव्हा त्याच्यासारखा दुसरा व्याधीग्रस्त मित्र किंवा नातेवाईक भेटतो तेव्हा तो त्याला तेच औषध घेण्याचा सल्ला देतो. कारण त्याला आराम पडलेला असतो, पण प्रत्येकाची प्रकृती ही वेगळी असते, त्यामुळे एकच औषध सगळ्यांना सारखेच लागू होत नाही. काही वेळा त्याचा त्रासदायक परिणामसुद्धा होऊ शकतो. त्यामुळे आकर्षकरित्या प्रसारित केल्या जाणाऱ्या जाहिरातींच्या मोहाला बळी पडू नये.

आपल्याला काही त्रास होत असल्यास त्या व्याधीशी संबंधित डॉक्टरकडे जाऊन त्यावर उपचार घेणेच योग्य आहे. जर कुणी जाहिरातीवरून औषध घेतले आणि त्यापासून त्रास झाला तर त्यावर उपाय कोण सांगणार? त्यासाठी त्याला डॉक्टरकडेच जावे लागेल. त्यापेक्षा अगोदरच डॉक्टरकडे जाऊन योग्य ते औषध घ्यावे. आजच्या काळात आजारांचेही स्वरूप बदलले आहे. एका आजारामागे इतर आजार दडल्याची अनेक उदाहरणे शेवटच्या क्षणी समोर येतात. त्यामुळे सजग नागरिकांनी स्वत:बरोबरच घरातील इतर सदस्यांसाठी आरोग्यासंबंधी निर्णय घेताना जाहिरातींना बळी न पडता प्रत्यक्ष तज्ज्ञमंडळींचाच सल्ला घेणे शहाणपणाचे ठरेल. नाहीतर तेल गेलं तूप गेलं हाती राहिलं धुपाटणं, अशी गत होण्यास वेळ लागणार नाही.

# उंटांनाही मिळणार मानवांसारखा पासपोर्ट !

महाराष्ट्र जीत

सौदी अरेबिया उंटासाठी अधिकृत पासपोर्ट जारी करण्याची योजना आखत आहे. हा निर्णय सौदी संस्कृती आणि अर्थव्यवस्थेत उंटांची महत्वाची भूमिका अधारेखित करतो. देशाच्या पर्यावरण, पाण आणि कृषी मंत्रालयाचे उद्दिष्ट या उपक्रमाद्वारे उंटांच्या संख्येचे चांगले व्यवस्थापन करण्याचे आहे. उंट पालनात उत्पादकता आणिकार्यक्षमता वाढविण्यासाठी एक विश्वासर्ह राष्ट्रीय डेटाबेस तयार करणे हे आहे. मंत्रालयाने या हिरव्या पासपोर्टचे फोटो देखील शेअर केले आहेत, ज्यामध्ये सौदी अरेबियाचे राज्य चिन्ह आणि सोनेरी उंट आहे.

राज्य प्रसारक अल अखबारियाच्या मते, हा पासपोट्ट उंटांचा व्यापार आणि वाहतूक सुव्यवस्थित करण्यास मतद करेल. शिवाय, हा दस्तऐवज उंट मालकांच्या हक्कांचे रक्षण करेल आणि मालकी सिद्ध करणे सोपे करेल. सरकारी आकडेवारीनुसार २०२४ पर्यंत सौदी अरेबियामध्ये अंदाज २.२ दशलक्ष उंट असतील. ही मोठी संख्या पहता, हा उपक्रम आणखी महत्वाचा आणि संबंधित मानला जातो.

उंट हे अरबी द्वीपकल्पात शतकानुशतके एक महत्वपूर्ण शक्ती राहिले आहेत. ते केवळ वाहतुकीचे साधन राहीलेले नाही तर संपत्ती, प्रतिष्ठा आणि सामाजिक प्रतिष्ठेचे प्रतीक देखील मानले गेले आहेत. आज उंट हे एक भरभराटीच्या प्रजनन उद्योगाचा भाग आहेत आणि वार्षिक उंट सौंदर्य स्पर्धांचे केंद्रबिंदू आहेत. या स्पर्धांमध्ये अनेक मौल्यवान उंट लाखो डॉलर्सना विकले जातात. अलिकडच्या वर्षात सौदी अधिकाऱ्यांनी ओठ आणि कुबड्1या बदलण्यासारख्या बेकायदेशीर कॉस्मेटिक प्रक्रियांवर देखील बंदी घातली आहे, कारण त्या नैसर्गिक सौंदर्यासाठी हानिकारक मानल्या जातात.

२०२१ मध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासातून असे दिसून आले आहे की, सौदी अरेबियामध्ये सापडलेल्या ७०००वर्षे जुन्या उंटांच्या कोरीवकामातून देशाचा प्राण्याशी खोल ऐतिहासिक संबंध असल्याचे सिद्ध होते. अनाडोलू संस्थेनुसार, उंटासाठीचा हा पासपोर्ट एक व्यापक ओळख दस्तऐवज असेल. त्यात मायक्रोचिप क्रमांक, नाव, जन्मतारीख , जाती , लिंग , रंग, जन्मस्थान पासपोर्ट जारी रकण्याचे ठिकाण आणि स्थान यासारखी संपूर्ण माहिती असेल. ओळख पटविण्यासाठी पासपोर्टमध्ये दोन्ही बाजूंच्या उंटांचे स्पष्ट फोटो दखील समाविष्ट केले जातील.

या उंट पासपोर्टमध्ये एक स्वतंत्र लसीकरण टेबल देखील असेल,ज्यामध्ये सर्व पशुवैद्यकिय लसीकरणांची स्पष्टपणे नोंद असेल. हे रेकॉर्ड पशुवैद्यकाचे नाव, स्वाक्षरी आणि अधिकृत शिक्का वापरुन पुष्टी केले जातील. अनधिकृत आकडेवारीनुसार सौदी अरेबियामध्ये अंदाजे ८०,००० उंट मालक आहेत. यामुळे सौदी अरेबिया जगातील आघाडीच्या उंट-मालक देशांपैकी एक बनला आहे.

# जालना पोलीसांची दमदार कारवाई

## आईस्क्रीम विक्रेत्याचे अपहरण करुन अमाणषपणे मारहाण करुन लुटमार करणारे तीन आरोपीतांना घेतले ताब्यात

पोलीस ठाणे तालुका जालना येथे दिनांक 22.01.2026 रोजी सायंकाळी 17.00 वाजता पोलीस नियंत्रण कक्ष जालना येथून माहीती मिळाली कि, मंठा रोडवरुन एका आईसक्रीम विक्रेत्यास काही लोकांनी मारहाण करुन जबरीने त्याचे गाडीत बसवून अपहरण करुन नेले आहे व अज्ञातस्थळी नेवून मारहाण करून पैशांची मागणी करीत आहेत व पैसे न दिल्यास जिवे मारण्याची धमकी देत आहेत अशी माहीती मिळताच पोलीस ठाणे तालुका जालना चे पोलीस निरीक्षक श्री. संतोष साबळे यांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेवून तात्काळ डी. बी. पथकासह तीन तपास पथके तयार करुन सुचना देवून अपहृत व्यक्तीचा पोस्टे हद्दीत नाव्हा, सिंधीकाळेगाव व वाघरुळ याप्रमाणे शोध घेणेकामी रवाना केले, परंतु आरोपींना अपहृत व्यक्तीचे मोबाईलवर फोनपे वरुन पैसे मिळताच अंधाराचा फायदा घेवून मोबाईल बंद करुन फरार झाले शोध पथकाने अपहृत व्यक्ती आणि वाहन हे मंठा चौफुली येथून अवघ्या दोन ते अडीच तासात सुटका करुन त्यास अमाणुष मारहाण झालेली असल्याने त्यास वैद्यकीय उपचाराकामी संतकृपा हॉस्पीटल जालना येथे दाखल केले, फिर्यादी नामे नवरत्न प्रकाश पुरी वय 19 वर्ष रा. भिलवाडा (राजस्थान) ह.मु. गायत्रीनगर जालना यांचे फिर्यादीवरुन गुन्हा दाखल असून सदर गुन्हयाचा तपास पोलीस उप निरीक्षक डिगांबर पवार हे करीत आहेत. पोलीस ठाणे तालुका जालना गुन्हे शोध पथक आरोपीतांचा शोध घेत होते परंतु आरोपींबाबत काहीही उपयुक्त माहीती मिळून येत नसल्याने जालना जिल्हयातील अशा पध्दतीने गुन्हे करणारे सर्व आरोपी यांची माहीती संकलीत करुन संशयित गुन्हेगारांचे फोटो गुन्ह्यातील पोडीत यांस दाखवले, दिनांक 22.01.2026 रोजी अशाच प्रकारचा गुन्हा करुन इसम नामे ओमकार मारुती पवार रा. पिरकल्याण ता.जि.जालना हमु. कल्याण (ठाणे) हा



दिनांक 22.01.2026 रोजीपासून फरार असले बाबत माहीती मिळालेवरुन त्याच्या सोबतचे त्याचे मित्र नामे सचिन शिवशंकर केदारे, रा. गांधीचमन माळीपुरा जुना जालना व सुमित शैलेश डुरे, रा.विठठल मंदीर कज्बा जुना जालना यांचा शोध घेत असतांना ते जालन्याकडून देउळगावराजा कडे जात असल्याची माहीती मिळताच पोलीस स्टेशन तालुका जालना गुन्हे शोध पथकाचे पोलीस अंमलदार यांनी देऊळगावराजा येथून दोन्ही इसमांचा पाठलाग करुन ताब्यात घेवून विचारपूस केली असता त्यांनी व त्यांचा साथीदार ओमकार मारुती पवार यांनी संयुक्तरित्या गुन्हा केल्याची कबूली दिली म्हणून त्यांना पोलीस स्टेशनला आणून गुन्ह्यात अटक केले. तसेच फरार आरोपी नामे ओमकार मारुती पवार हा पुणे येथे असले बाबत माहीती मिळाल्याने त्याला पुणे व अहिल्यानगरचे सीमेवरुन एका हॉटेलमधून दिनांक 04.02.2026 रोजी पहाटे पाच वाजेच्या सुमारास ताब्यात घेवून पोलीस स्टेशनला ला आणून विचारपूस केली असता त्याने देखील गुन्हा केल्याची कबूली दिल्याने त्यास सदर गुन्हयाचे तपासकामी अटक करण्यात आली. सदर गुन्हयातील तीन्ही आरोपीत सध्या पीसीआर मध्ये आहेत.

नमुद आरोपीताकडुन गुन्हयात वापरलेला आरोपीचा मोबाईल, चोरी गेलेला फिर्यादीचा मोबाईल, फिर्यादीचे फोन पे व्दारे वेगवेगळया ठिकाणावरुन काढलेले व फिर्यादी जवळचे बळजबरीने काढलेले आरोपीतांकडुन असे एकुण 6900/-रुपये, आरोपीतांनी गुन्हयात वापरलेले दोन लाकडी काठ्या, एक आईसक्रीम कटर, नट खोलन्याचा पान्हा व फिर्यास बांधन्यासाठी वापरण्यात आलेली दोरी ईत्यादी मुददेमाल आरोपीतांकडुन जप्त करण्यात आला.

सदरची कामगिरी श्री. अजयकुमार बन्सल (पोलीस अधीक्षक जालना), श्री. आयुष नोपाणी (अपर पोलीस अधीक्षक), श्री. अनंत कुलकर्णी (उपविभागीय पोलीस अधिकारी) यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे तालुका जालना चे श्री संतोष साबळे (पोलीस निरीक्षक), दिगंबर पवार (पोलीस उप निरीक्षक), पोलीस अंमलदार सचिन आर्य, विशाल काळे, दयानंद मोरे, राम शेंडीवाले, वंसत धस, चंद्रकांत माळी, उषा चव्हाण, आदींनी पार पाडली.

## श्रीवर्धनमध्ये जिल्हा परिषद–पंचायत समिती निवडणुका जोषात; दिग्गजांची प्रतिष्ठा पणाला

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी :** श्रीवर्धन तालुक्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका अत्यंत उत्साही व चुरशीच्या वातावरणात पार पडल्या. राष्ट्रवादी काँग्रेस–भाजप तसेच शिवसेना (शिंदे गट) आणि शिवसेना (उबाठा) यांच्यात थेट व अटीतटीची लढत पाहायला मिळाली. सगळ्या पक्षांनी जोरदार प्रचार केला आहे.

या निवडणुकांमध्ये श्रीवर्धनमधील अनेक प्रमुख व प्रभावी नेत्यांची प्रतिष्ठा पणाला लागली असून, मतदारांनी मोठ्या प्रमाणात मतदान करत लोकशाही उत्सव साजरा केला. आता या निवडणुकांचे निकाल स्थानिक राजकारणाची



पुढील दिशा ठरवणारे ठरणार असल्याने संपूर्ण तालुक्याचे लक्ष निकालाकडे लागले आहे.

## जी.के.एस कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय खडवलीच्या विद्यार्थ्यांनी नॅशनल यूथ गेम चैंपियनशिपमध्ये प्रथम क्रमांकावर विजय

**ठाणे :** नॅशनल यूथ गेम चैंपियनशिप २०२५ गोवा राज्यातील मडगाव या ठिकाणी श्री.हेमंत पवार( सचिव )यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच संपन्न झाली.यामध्ये ठाणे जिल्ह्यातील मैत्रेय बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे जी.के. एस.कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांकाने बाजी मारली या स्पर्धा दिनांक ३०/०१/२०२६ ते ०१/०२/२०२६ अशाप्रकारे सुरु होत्या.या स्पर्धेत महाविद्यालयातील




इयत्ता अकरावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन महाराष्ट्रा सोबतच महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व केले.यामध्ये प्रामुख्याने महाविद्यालयातून कबड्डी व T -20 क्रिकेट Tournament 2026 या दोन खेळासाठी दोन संघ सहभागी झाले होते.या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करून कबड्डी संघाने प्रथम क्रमांक मिळवला. तसेच क्रिकेट संघाने प्रथम क्रमांक पटकावून उकृष्ट कामगिरी केली.या यशामुळे विजयी संघाचे नेपाळ येथे अंतरराष्ट्रीय स्तरावर होणाऱ्या स्पर्धेसाठी निवड झाली.या उत्तुंग यशामागे महाविद्यालयाचे खेळाडू शिक्षक व सौ.हर्षला विषे मॅडम तसेच श्री. बाळाराम चौधरी यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले.विजयी खेळाडूंचे महाविद्यालयाच्या संचालिका सौ.कविता शिकतोडे मॅडम तसेच प्राचार्य डॉ.एस.जी.सागर सर उप-प्राचार्य प्रा.प्रशांत तांदळे सर यांनी सर्व खेळाडू व खेळाडू शिक्षकांचे कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## रिसोड तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा;रिसोड येथील प्रसिद्ध वकील ॲड. शरद मोरे यांचे सुपुत्र यश मोरे लॉ विषयातून नेट उत्तीर्ण

**रिसोड (तालुका प्रतिनीधी)/ :** रिसोड येथील प्रसिद्ध वकील ॲड. शरद विश्वनाथ मोरे यांचे सुपुत्र यश शरद मोरे यांनी विधी (Law) विषयातून राष्ट्रीय पात्रता परीक्षा (NET) उत्तीर्ण करून घवघवीत यश संपादन केले आहे. मूळचे रिसोड तालुक्यातील सवड गावचे रहिवासी असलेले ॲड. शरद विश्वनाथ मोरे हे रिसोड दिवाणी न्यायालयात वकिली व्यवसाय करतात. त्यांचे सुपुत्र यश यांनी देशातील अत्यंत कठीण समजली जाणारी आणि 'युजीसी' (UGC), नवी दिल्ली यांच्यामार्फत ३१ डिसेंबर २०२५ रोजी घेण्यात आलेली सहाय्यक प्राध्यापक



पदासाठीची राष्ट्रीय पात्रता परीक्षा (NET) पहिल्याच प्रयत्नात उत्तीर्ण केली आहे. यश यांनी त्यांचे विधी शाखेतील उच्च शिक्षण (LLB/ LLM) पूर्ण केले असून, पहिल्याच प्रयत्नात हे यश मिळवल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून कौतुक व अभिनंदन होत आहे. त्यांच्या या यशामुळे रिसोड तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. . शरद विश्वनाथ मोरे यांचे सुपुत्र यश शरद मोरे यांनी विधी (Law) विषयातून राष्ट्रीय पात्रता परीक्षा (NET) उत्तीर्ण करून घवघवीत यश संपादन केले आहे. मूळचे रिसोड तालुक्यातील सवड गावचे रहिवासी असलेले ॲड. शरद विश्वनाथ मोरे हे रिसोड दिवाणी न्यायालयात वकिली व्यवसाय करतात. त्यांचे सुपुत्र यश यांनी देशातील अत्यंत कठीण समजली जाणारी आणि 'युजीसी' (UGC), नवी दिल्ली यांच्यामार्फत ३१ डिसेंबर २०२५ रोजी घेण्यात आलेली सहाय्यक प्राध्यापक पदासाठीची राष्ट्रीय पात्रता परीक्षा (NET) पहिल्याच प्रयत्नात उत्तीर्ण केली आहे. यश यांनी त्यांचे विधी शाखेतील उच्च शिक्षण (LLB/ LLM) पूर्ण केले असून, पहिल्याच प्रयत्नात हे यश मिळवल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून कौतुक व अभिनंदन होत आहे. त्यांच्या या यशामुळे रिसोड तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

यांचा आदर्श विविध क्षेत्रात तयारी करणा-या विद्यार्थानी घेऊन मेहनत चिकाटीने अभ्यास केल्यास यश हमखास मिळते हे निश्चित करावे यश शरद मोरे हे माजी.नगराध्यक्ष दिवंगत बाबुराव जुमडे यांचे नातु आहेत.

## माता रमाईस लेझिम पथकाने दिली जयंती दिनी मानवंदना

**किनवट प्रतिनिधी** : त्यागमूर्ती रमाई भीमराव आंबेडकर यांचा 7 फेब्रुवारी हा जन्मदिवस त्यानिमित्ताने इस्लापूर आंबेडकर नगर येथील लुम्बिनी बौद्ध विहार येथे रमाई जयंती उत्साहात साजरी करण्यात आली

सर्व प्रथम आंबेडकर नगर येथील जेष्ठ नागरी जमदाडे साहेब यांच्या हस्ते पंचशील ध्वजारोहण करण्यात आले व पंचशील त्रिशरण घेण्यात आले त्या नंतर लेझीम पथकाने रमाईच्या गीतावर लेझीम नृत्य सादरकरून अभिवादन केले या लेझीम पथकात शुभांगी वाघमारे.प्रमिता हनवते, कोमल लोखंडे, निकिता हनवते शिल्पा शेळके अंकिता शेळके रोशनी शेळके वंदना शेळके पूनम शेळके सीमा शेळके सोनी शेळके मोनिका शेळके कोमल हाटेकर सारिका शेळके पौर्णिमा शेळके इतर



महिलांनी सहभाग घेतला..

या कार्यक्रमाला संदीप शेळके नारायण शिनगारे जगदिप हनवते कोंडीबा हट्टेकर शिदोधन पवार विकास लोखाडे सिद्धार्थ घुगे संघपाल शेळके राजपाल शेळके सूरज शेळके रुपेश चव्हाण बापूराव पवार नागेश पाटील यांच्या सह गावातील महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते या कार्यक्रमाचे सूत्र संचलन गौरव कदम यांनी केले व आभार प्रदर्शन हिरामण शेळके यांनी मानले

## प्रशासनाकडून भगिनींच्या मागणीची दखल 'लाडकी बहीण' योजनेतील तांत्रिक त्रुटी दूर होणार, सौ. राधाबाई कामारकर यांनी मानले आभार

**महागाव:- (यवतमाळ) :** 'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' योजनेच्या अंमलबजावणीत येणाऱ्या तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी राज्य शासनाने सकारात्मक पाऊल उचलले आहे. यवतमाळ जिल्ह्यातील सौ. राधाबाई भीमराव कामारकर



यांनी केलेल्या मागणीची दखल घेत, शासनाने ई-केवायसी (e-KYC) माहितीमध्ये सुधारणा करण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे. प्रशासनाच्या या संवेदनशील निर्णयाबद्दल सौ. राधाबाई यांनी समाधान व्यक्त करत राज्य सरकारचे आभार मानले आहेत.या योजनेअंतर्गत अनेक पात्र महिलांना तांत्रिक कारणांमुळे किंवा अर्जातील चुकीच्या पर्यायांच्या निवडीमुळे लाभापासून वंचित राहावे लागले होते. ही बाब सौ. राधाबाई कामारकर यांनी पत्राद्वारे प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिली होती. ई-केवायसी करताना झालेल्या चुकांमुळे पोर्टलवर माहिती अपडेट होत नसल्याने लाखो भगिनींचे अनुदान रखडले होते. यावर तोडगा काढण्याची विनंती त्यांनी केली होती.महिला व बाल विकास विभागाने या निवेदनाची तत्परतेने दखल घेत ६ फेब्रुवारी २०२६ रोजी नवीन शासन परिपत्रक प्रसिद्ध केले. यानुसार, ज्या महिलांनी ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत ई-केवायसी केली होती, परंतु माहिती भरताना तांत्रिक चुका झाल्या होत्या, त्यांना आता ३१ मार्च २०२६ पर्यंत आपली माहिती सुधारता येणार आहे. यासाठी पोर्टलवर आवश्यक बदल करण्यात आले असून महिलांना ही माहिती पुन्हा एकदा अचूक भरण्याची संधी देण्यात आली आहे.या निर्णयावर आपली प्रतिक्रिया देताना सौ. राधाबाई कामारकर म्हणाल्या, "प्रशासनाने महिलांच्या अडचणी समजून घेतल्या आणि तातडीने निर्णय घेतला, ही आनंदाची बाब आहे. ई-केवायसीमधील दुरुस्तीच्या संधीमुळे अनेक गरजू महिलांना त्यांचा हक्क परत मिळणार आहे.

## वधवन पोर्ट स्किलिंग प्रोग्रामअंतर्गत युवकांचा सन्मान; केंद्रीय मंत्र्यांच्या उपस्थितीत भव्य कार्यक्रम

**उरण :** भारतातील १३वे प्रमुख बंदर असलेल्या वधवन पोर्ट प्रोजेक्ट लिमिटेड (VPPL) यांच्या वतीने वधवन पोर्ट स्किलिंग प्रोग्राम अंतर्गत स्थानिक युवकांचा सन्मान करण्यासाठी शनिवार, ७ फेब्रुवारी २०२६ रोजी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला केंद्रीय बंदरे, जहाजबांधणी व जलमार्ग मंत्री श्री. सर्बानंद सोनोवाल आणि बंदरे, जहाजबांधणी व जलमार्ग मंत्रालयाचे सचिव श्री. विजय कुमार, आयएएस यांची प्रमुख उपस्थिती लाभली.कार्यक्रमात मान्यवरांचे स्वागत जेएनपीएचे अध्यक्ष व VPPL चे CMD श्री. गौरव दयाल, आयएएस यांनी केले. यावेळी जेएनपीएचे उपाध्यक्ष श्री. रवीश कुमार सिंग, आयआरटीएस उपस्थित होते. दुसऱ्या बॅचमधील कस्टम्स डॉक्युमेंटेशन कोर्स यशस्वीरीत्या पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना केंद्रीय मंत्र्यांच्या हस्ते प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. ४ आठवड्यांच्या या अभ्यासक्रमात १०० तासांचे सैद्धांतिक व प्रात्यक्षिक प्रशिक्षण देण्यात येते.

याच कार्यक्रमात GP रेटिंग प्री-सी ट्रेनिंग कोर्स



अंतर्गत ११ विद्यार्थ्यांना प्रवेश पुष्टीपत्रे देण्यात आली. हा सहा महिन्यांचा निवासी अभ्यासक्रम शिपिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (SCI) यांच्या सहकार्याने राबविण्यात येत असून, प्रति विद्यार्थी ₹२.५ लाख इतका संपूर्ण खर्च VPPL कडून वहन केला जाणार आहे.

स्थानिक युवकांसाठी रोजगाराच्या संधी वाढविण्याच्या दिशेने आणखी एक महत्त्वाचे पाऊल टाकत, कौशल्य निर्मिती योजना अंतर्गत गेटवे टर्मिनल्स इंडिया (GTI) यांना लेटर ऑफ अवॉर्ड प्रदान करण्यात आले.

या योजनेअंतर्गत वधवन परिसरातील युवकांना कंटेनर टर्मिनल असोसिएट्स म्हणून प्रशिक्षण देण्यात येणार असून, प्रशिक्षण पूर्णतः निवासी व अर्थसहाय्यित असेल.

कार्यक्रमादरम्यान VPPL आणि महाराष्ट्र शासनाच्या व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय (DVET) यांच्यात सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या.

याअंतर्गत PM-SETU योजनेद्वारे वधवन परिसरातील ४४ गावांमधील विद्यार्थ्यांना ITI मध्ये मोफत कौशल्य प्रशिक्षण दिले जाणार आहे.